तात्काळ

दु.क्र.- २२८३९९२४
फॅक्स- २२८३१०१७
e-mail : rdd_panchayatraj_dc06

क्रमांक : संकिर्ण -२००३/प्र. क्र. ४५/पंरा-२,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ऑगस्ट, २००५.

प्रति,

मा. सचिव,
राज्य निवडणूक आयोग,
नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई - ३२.

विषय : जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्या संबंधीच्या अधिनियमात नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गाच्या व्याख्येत दुरुस्त्या करणे.

महोदय,

जिल्हा परिषद व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत अधिनियमांनुसार नागरीकांचा मागासवर्ग म्हणजे राज्य शासनाने इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती आणि भटक्या जमाती म्हणून वेळोवेळी घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गाचे भाग अथवा त्यामधील गट, अशी व्याख्या केलेली आहे.

सामाजिक न्याय विभागाने दिनांक ५-१०-९६ च्या पत्रामध्येही असे स्पष्ट केले आहे की, विशेष मागास प्रवर्गात समावेश असलेल्या जातींचा समावेश, नागरीकांचा मागासवर्ग या प्रवर्गामध्ये होत आहे. केवळ त्यांना विशेष सवलती शासनाने जाहीर केलेल्या आहेत. विशेष मागास प्रवर्गातील काही जाती यापूर्वी इतर मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होत्या. त्यांचा समावेश विशेष मागासप्रवर्गात झाल्यामुळे इतर मागास प्रवर्गाच्या यादीतून त्या वगळण्यात आल्या. काही जाती प्रथमच विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केलेल्या आहेत, असे जरी असले तरी त्यांचा समावेश नागरीकांचा मागासप्रवर्ग या प्रवर्गासाठी ज्यांचा समावेश करण्यात आलेला आहे, त्यामध्ये विशेष मागासप्रवर्गाचा समावेश अंतर्भूत राहील, असे स्पष्ट केलेले आहे.

C:\Vaibhav\CR-55

विशेष मागासप्रवर्ग हा केवळ शासनाने जाहीर केलेल्या विशेष सवलतींसाठी असल्याने अधिनियमामध्ये नागरीकांचा मागासवर्ग या प्रवर्गाची जी व्याख्या देण्यात आलेली आहे, त्यामध्ये कोणतीही सुधारणा करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(सुनील चव्हाण)
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन.